RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ४१

दि. ०२ जून २०२६, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## कच्च्या तेलाच्या किंमतींनी विक्रमी टप्पा गाठला

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक स्तरावर महागाईने डोके वर काढले आहे. अमेरिका आणि इराण यांच्या धोरणामुळे जागतिक स्तरावर मोठ्या हालचाली घडत आहे. आता पुन्हा एकदा जागतिक घडामोडींमुळे कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ नोंदवण्यात आली आहे. अमेरिका-इराण तणावाचा थेट परिणाम तेल पुरवठ्यावर होत आहे , त्यामुळे बाजारात देखील तेजी आली आहे.

कच्च्या तेलाच्या किंमतींनी विक्रमी टप्पा गाठला असून कच्च्या तेलाची प्रति बॅरल किंमत ९३ डॉलरवर पोहोचली आहे. म्हणजेच कच्च्या तेलाच्या किंमतीत २ टक्क्यांनी वाढ झाल्याचे सांगितले जात आहे. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार इस्रायलने लेबनॉनवर केलेल्या भयंकर हल्ल्यामुळे या किंमती वधारल्या आहेत. या तणावामुळे जागतिक पातळीवर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

आज जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती सुरुवातीपासून वाढण्यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता कराराबाबत वाढती अनिश्चितता. तेहरान अजूनही आपल्या मागण्यांवर ठाम आहे, ते होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण आणि अण्वस्त्रांशी संबंधित संरक्षणाची मागणी करीत आहेत. अमेरिका या दोन्ही मागण्या सातत्याने फेटाळून लावत आहे. वॉशिंग्टनने यापूर्वीच सांगितले आहे की, प्रमुख जलमार्गावरील जहाजांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारणे योग्य नाही. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा म्हटले आहे की, जो करार वाईट करार म्हणून वर्णन केला जाईल तो आपण स्वीकारणार नाही.

## शुभम कुमार देशात अव्वल; मुलींमध्ये आरोही देशपांडे ठरली टॉपर!

**नवी दिल्ली :** जेईई ॲडव्हान्स्ड २०२६ परीक्षेचा निकाल अधिकृतपणे जाहीर करण्यात आला आहे. यंदा आयआयटी दिल्ली झोनच्या विद्यार्थ्यांनी कॉमन रँक लिस्टमध्ये वर्चस्व गाजवत पहिल्या तीन क्रमांकांवर कब्जा केला आहे. शुभम कुमार याने ऑल इंडिया रँक १ मिळवत देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर विद्यार्थिनींमध्ये आरोही देशपांडे हिने सर्वोच्च स्थान मिळवत महिला गटात अव्वल कामगिरी केली आहे.

अधिकृत प्रसिद्धीपत्रकानुसार, शुभम कुमार याने ३६० पैकी ३३० गुण मिळवत पहिला क्रमांक मिळवला. दुसऱ्या क्रमांकावर कबीर छिल्लर असून त्याने ३२९ गुणांची कमाई केली आहे. तर जतिन चाहर याने ३१९ गुणांसह तिसरे स्थान पटकावले. महिला उमेदवारांमध्ये अव्वल ठरलेल्या आरोही देशपांडे हिने २८० गुण मिळवले आहेत. व्एए अ्नरहम् २०२६ चा निकाल १ जून रोजी पहाटे सुमारे २ वाजता जाहीर करण्यात आला.

यंदा व्एए अ्नरहम् २०२६ परीक्षेसाठी एकूण १ लाख ८७ हजार ३८९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १ लाख ७९ हजार ६९४ उमेदवारांनी १७ मे रोजी झालेल्या परीक्षेला हजेरी लावली होती. जाहीर करण्यात आलेल्या निकालानुसार, एकूण ५६ हजार ८८० उमेदवारांनी परीक्षा उत्तीर्ण केली आहे. विशेष म्हणजे, यामध्ये १० हजार १०७ विद्यार्थिनींचा समावेश आहे.

व्एए अ्नरहम् २०२६ परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना आता अधिकृत वेबसाइटवर जाऊन आपले स्कोअरकार्ड पाहता येणार आहे. निकाल तपासण्यासाठी उमेदवारांना रोल नंबर, जन्मतारीख आणि नोंदणीकृत मोबाईल क्रमांकाची आवश्यकता असेल.

## मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांची सर्वोच्च न्यायालयात बढती

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांची सर्वोच्च न्यायालयात बढती करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायवृंदाने केलेल्या शिफारशीला केंद्र सरकारने सोमवारी सकाळी मंजूरी दिली.

गेल्या २२ आणि २७ मे रोजी पार पडलेल्या न्यायवृंदाच्या बैठकांमध्ये या शिफारशीचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. त्यानंतर हा प्रस्ताव मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला होता. मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांची जुलै २०२५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात बदली करण्यात आली होती. ऑगस्ट २०२५ मध्ये मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांची सर्वोच्च न्यायालयात पदोन्नती झाल्यानंतर, श्री चंद्रशेखर यांची मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी ९ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्य न्यायमूर्तीपदाची शपथ घेतली.

यापूर्वी, मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर हे राजस्थान उच्च न्यायालयात कार्यरत होते. त्याआधी, २०१३ मध्ये झारखंड उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती होण्यापूर्वी, त्यांनी जवळपास दोन दशके दिल्लीमध्ये वकिली केली होती. त्यानंतर त्यांनी झारखंड उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती म्हणून काम पाहिले आणि २०२४ मध्ये त्यांची राजस्थान उच्च न्यायालयात बदली करण्यात आली.

# ई-बसेससाठी चार्जिंग स्टेशनचे जाळे उभारा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

### 'विकसित महाराष्ट्र' अंतर्गत एसटीचा १०० टक्के ताफा ई-बसेसमध्ये रूपांतरित करण्याचे उद्दिष्ट

**मुंबई/प्रतिनिधी :** 'विकसित महाराष्ट्र अंतर्गत' पर्यंत एसटी महामंडळामध्ये सन २०२९ पर्यंत ५० टक्के, २०३५ पर्यंत ८० टक्के; तर २०४७ पर्यंत एसटीचा १०० टक्के ताफा ई-बसेसमध्ये रूपांतरीत करायचा आहे. या अनुषंगाने बसेससाठी आवश्यक असलेले चार्जिंग स्टेशन उभारण्याच्या कामाला गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा येथील निवासस्थानी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या इ-बसेससंदर्भात बैठक झाली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक (दूरदृश्य प्रणालीद्वारे), मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, अपर मुख्य सचिव संजय सेठी, एसटीचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, उपसचिव चेतन निकम आदी या बैठकीस उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पर्यावरणपूरक ई-बसेस ज्या मार्गावर चालवायच्या आहेत, त्या मार्गाचा कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाने अभ्यास करावा. पुरवठादाराकडून बस प्राप्त होताच त्या बसेसचे पुढील ७ दिवसात निरीक्षण करावे. या बसेसकरिता एक इकोसिस्टिम तयार करावी. ज्या मार्गाने खाजगी बसेस धावतात, त्या मार्गाचाही अभ्यास करून ई-बसेसचा पर्याय तयार ठेवावा.

राज्य शासनाच्या विद्यमान ई-वाहन धोरणांतर्गत सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत ई-बसेसचा वापर वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. या धोरणानुसार १,५०० ई-बसेसना बसच्या किमतीच्या १० टक्के किंवा कमाल २० लाख रुपये इतके अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात पर्यावरणपूरक आणि शाश्वत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था विकसित करण्याच्या उद्देशाने हे धोरण महत्त्वपूर्ण आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ सध्या जीसीसी मॉडेलवर ५,१५० ई-बसचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवत आहे. या प्रकल्पामुळे राज्यातील प्रवाशांना आधुनिक, आरामदायी आणि प्रदूषणमुक्त प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.



## ग्राहकांना पुन्हा झटका! गॅस सिलेंडरच्या दरात वाढ; आजपासून नवे दर लागू

नवी दिल्ली : देशातील ऑइल मार्केटिंग कंपन्यांनी एलपीजी सिलेंडरच्या किमतीत पुन्हा एकदा वाढ करण्याची घोषणा केली आहे. मात्र, ही दरवाढ केवळ १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलेंडर आणि पाच किलोच्या लहान सिलेंडरपुरतीच मर्यादित आहे. घरगुती वापरासाठीच्या १४.२ किलोच्या एलपीजी सिलेंडरच्या किमतीत कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. ऑइल मार्केटिंग कंपन्यांनी १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किमतीत ४२ रुपयांपासून ५३.५० रुपयांपर्यंत वाढ केली आहे. नवीन दर आजपासून लागू झाले आहेत.

यापूर्वी गेल्या महिन्याच्या पहिल्या दिवशी म्हणजेच १ मे रोजी व्यावसायिक सिलेंडरच्या किमतीत सुमारे एक हजार रुपयांची वाढ करण्यात आली होती. दिल्लीमध्ये ही वाढ ९९३ रुपये होती, तर कोलकातामध्ये व्यावसायिक गॅस सिलेंडरची किंमत ९९८.५० रुपयांनी वाढली होती. त्याचप्रमाणे मुंबईमध्ये व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किमतीत ९९३ रुपयांची वाढ झाली होती. तर चेन्नईमध्ये व्यावसायिक गॅस सिलेंडर ९९०.५० रुपयांनी महागला होता. आजच्या दरवाढीनंतर राजधानी दिल्लीमध्ये व्यावसायिक एलपीजी गॅस सिलेंडरची किंमत ३,११३.५० रुपये झाली असून कोलकातामध्ये ती वाढून ३,२५५.५० रुपयांवर पोहोचली आहे. मुंबईमध्ये व्यावसायिक गॅस सिलेंडर आज सकाळपासून ३,०६७.५० रुपयांना उपलब्ध आहे, तर चेन्नईमध्ये त्याची किंमत वाढून ३,२८३.५० रुपये झाली आहे.

## पार्थ पवारांवर नाराज नाही : सुनील तटकरे

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतून कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या पदांचा उल्लेख टाळल्यामुळे दोन्ही नेते पार्थ पवार यांच्यावर नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. त्यावर खुद्द तटकरे यांनी भाष्य केले आहे. ते म्हणाले, ''अजितदादांच्या निधनानंतर पार्थ पवार आणि जय पवार हे राजकारणात अधिक सक्रिय झाले असून ही अतिशय चांगली आणि सकारात्मक गोष्ट आहे. पार्थ पवार किंवा पवार कुटुंबातील कोणावरही माझी कोणतीही नाराजी असण्याचे कारण नाही. अजितदादांच्या निधनानंतर आता पक्षाला नवा आकार देत पुढची मजबूत वाटचाल करणे हेच आपले मुख्य ध्येय आहे'', असे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.



दरम्यान, राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चांवर पुन्हा नाराजी व्यक्त तटकरे म्हणाले, अजितदादांचे पार्थिव समोर असताना आणि कुटुंबासह संपूर्ण पक्ष दुःखात बुडालेला असताना काही नेत्यांनी ज्या प्रकारे विलीनीकरणाच्या चर्चा सुरू केल्या, ते अत्यंत वेदनादायी होते. हिंदू धर्माच्या परंपरेनुसार आणि पुरोगामी महाराष्ट्राच्या संस्कृतीनुसार सुतकाचे विधी सुरू असतानाच, दुसरीकडे पक्षातील काही प्रमुख नेत्यांनी वृत्तवाहिन्यांवर मुलाखतींचा सपाटा लावला होता. 'ही दादांची अंतिम इच्छा होती' किंवा 'अमुक एका तारखेला पक्षाचे विलीनीकरण होणार होते' अशा वावड्या उठवण्यात आल्या. जे नेते विलीनीकरणाचा सतत जप करत होते, त्यांच्यापैकी एकाच्याही मनात अजितदादांच्या पश्चात तात्काळ उपमुख्यमंत्रिपदाची सूत्रे कोणी हाती घ्यावीत, हा विचार का आला नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

अजितदादांची मूळ इच्छा सुरुवातीपासूनच भारतीय जनता पक्षासोबत जाऊन काम करण्याची होती. अगदी २०१४ च्या राजकीय घडामोडींपासून ते भाजपासोबत जाण्यास कमालीचे इच्छुक होते आणि ही इच्छा त्यांनी पक्षांतर्गत अनेकदा बोलून दाखवली होती. याच भूमिकेचा भाग म्हणून त्यांनी २०१९ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत पहाटेचा ऐतिहासिक शपथविधी केला होता. त्यामुळे विलीनीकरणाच्या वावड्या उठवण्यापेक्षा पक्षाच्या विचारसरणीशी आणि दादांच्या मूळ भूमिकेशी प्रामाणिक राहणे गरजेचे आहे. आता पार्थ पवारांसारखे तरुण नेतृत्व समर्थपणे मैदानात उतरत असल्यामुळे पक्षाला नवीन ऊर्जा मिळणार असून, सर्व ज्येष्ठ नेते आणि तरुण फळी एकत्र येऊन राष्ट्रवादी काँग्रेसची पुढील वाटचाल अधिक गतिमान करतील, असेही तटकरे यांनी सांगितले.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी जयंती उत्सव समितीद्वारा

## पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना विनम्र अभिवादन

**लातूर/प्रतिनिधी :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी जयंती उत्सव समितीद्वारा सन २०२२ पासून महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी, विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाज प्रबोधनपर कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येते.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.संजय वाघमारे आणि सचिव डॉ.बाळासाहेब गोडबोले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला आणि सर्व सदस्यांनी विनम्र अभिवादन केले. त्यानंतर विजयी घोषणा सुद्धा देण्यात आल्या.




यावेळी माजी उपप्राचार्य प्रा.कल्याण कांबळे, प्राचार्य डॉ.सिद्धार्थ सूर्यवंशी, बि. पि. सूर्यवंशी, कोषाध्यक्ष डॉ.संजय गवई, प्रा.प्रशांत उघाडे, प्रा.चक्षुपाल कांबळे, ॲड.सुरेश सलगरे, विनायक बोरीकर, बाबुराव गायकवाड यांच्या सह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# भाजपा उमेदवार बसवराज पाटील मुरूमकर यांचे आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

**लातूर/प्रतिनिधी :** धाराशिव - लातूर - बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातील भाजपाचे उमेदवार माजी मंत्री श्री. बसवराज पाटील मुरुमकर यांचा सोमवारी धाराशिव येथे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला याप्रसंगी भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांची उपस्थिती होती.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने विधान परिषद निवडणुकीतील धाराशिव - लातूर - बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून लातूर जिल्हा भाजपचे अध्यक्ष माजी मंत्री श्री. बसवराज पाटील मुरुमकर यांना उमेदवारी दिली असून त्यांनी सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. भाजपा पक्षश्रेष्ठींनी अधिकृत उमेदवारी दिल्याबद्दल श्री. बसवराज पाटील यांचे यावेळी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

याप्रसंगी औसा विधानसभा मतदारसंघाचे आ. अभिमन्यू पवार, माजी आमदार गोविंदआण्णा केंद्रे, माजी आमदार ज्येष्ठ मार्गदर्शक सुरजीतसिंह ठाकुर, प्रदेश भाजपाच्या उपाध्यक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, भाजपा प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके, या मतदार संघाचे माजी आमदार सुरेश धस, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, प्रदेश भाजपाचे दत्ताभाऊ कुलकर्णी, विक्रमकाका शिंदे, जि.प. सदस्य महादेव साळुंके, अनिल भिसे, महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, सुरज शिंदे, राजकिरण साठे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



## संपादकीय...

# भारतीय आत्मनिर्भरतेचा जागतिक डंका

'मेक इन इंडिया'ने जागतिक स्तरावर भारताचा दबदबा निर्माण केला असून, देशाची निर्यात २४.४० टक्क्यांनी वाढली आहे. आर्मेनियाच्या लष्करी संचलनात 'आकाश' आणि 'पिनाक' सारख्या स्वदेशी शस्त्रास्त्रांचे झालेले दर्शन, भारताच्या आर्थिक महासत्तेकडे होत असलेल्या वाटचालीची साक्ष देते. हा वाढता प्रभाव आत्मनिर्भर आणि शक्तिशाली भारताचा जागतिक विजय आहे. गेल्या काही वर्षांपासून भारताने 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया' या दोन महत्त्वाकांक्षी संकल्पनांच्या आधारे, आपली जागतिक रणनीती अतिशय आक्रमकपणे आखली आहे. आज या धोरणांची गोमटी फळे पाहायला मिळत आहेत. भारत आजवर शस्त्रास्त्रांसाठी विदेशांवर, प्रामुख्याने रशिया, युरोप आणि अमेरिकेवर अवलंबून होता. भारताची ओळख जगात 'सर्वाधिक शस्त्रे आयात करणारा देश' अशीच होती. मात्र, आज चित्र पूर्णपणे पालटले असून, आजचा नवा भारत जगातील अनेक देशांसाठी एक विश्वासार्ह, तंत्रज्ञानयुक्त आणि सक्षम शस्त्रास्त्र पुरवठादार म्हणून उदयास आला आहे. भारताची अर्थव्यवस्था आणि संरक्षण क्षेत्र या दोन्ही आघाड्यांवर, देशाने मिळवलेले यश हे ऐतिहासिकच आहे. भारतीय अर्थव्यवस्थेने जागतिक निर्यातीच्या क्षेत्रात ऐतिहासिक झेप घेतली. ताज्या आकडेवारीनुसार, भारताच्या निर्यातीत तब्बल २४.४० टक्क्यांची लक्षणीय वाढ नोंदवली गेली. देशाची एकूण निर्यात ४.०७ लाख कोटींच्या घरात पोहोचली असून, एका वर्षात भारतीय निर्यातीमध्ये ८० हजार कोटी रुपयांची वाढ झाली. इंजिनिअरिंग, फार्मास्युटिकल्स, इलेट्रॉनिक वस्तू, मोबाईल फोन्स आणि रसायने यांसारख्या क्षेत्रांमध्ये, भारताने जागतिक पुरवठा साखळीत आपले भक्कम स्थान निर्माण केले आहे. अमेरिका किंवा युरोपसारख्या पारंपरिक बाजारपेठांपुरतीच ही मागणी मर्यादित नसून, आशियाई देशांच्या बाजारपेठांमध्ये भारतीय उत्पादनांची मागणी वाढली आहे. महामारीनंतर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी 'चायना प्लस वन' हे जे जागतिक धोरण स्वीकारले, त्याचा सर्वाधिक फायदा भारताने घेतला. आर्थिक आघाडीवरील यशासोबतच भारताने संरक्षण क्षेत्रात घेतलेली गरुडझेप, अभिमानास्पद अशीच. आर्मेनिया या युरेशियन देशात राष्ट्रीय दिनानिमित्त एका लष्करी संचलनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भारताच्या 'मेक इन इंडिया' शस्त्रास्त्रांचे झालेले प्रदर्शन, जगाचे डोळे दीपवणारे ठरले. या परेडमध्ये भारताची संपूर्णपणे स्वदेशी निर्मिती असलेली 'आकाश' ही हवाई संरक्षण क्षेपणास्त्र प्रणाली आणि 'पिनाक मल्टी-बॅरल रॉकेट लॉन्चर'सारख्या, अत्यंत प्रगत शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन करण्यात आले. एका सार्वभौम देशाच्या राष्ट्रीय लष्करी संचलनात भारताच्या शस्त्रास्त्रांना असे मानाचे स्थान मिळणे, हे भारतीय उत्पादनाच्या जागतिक यशाला मिळालेली पोचपावतीच ठरते. कारगिल युद्धात ज्या देशाने बाहेरील देशांकडे शस्त्रास्त्रांसाठी हात पसरले होते. तोच देश आज आधुनिक युद्धतंत्रातील संहारक शस्त्रे जगाला विकत आहे, हा प्रवास खरोखरच थक्क करणारा असाच. आर्मेनियाला केलेल्या शस्त्रनिर्यातीमागे, भारताची एक अत्यंत सुस्पष्ट, प्रगल्भ आणि आक्रमक नीती आहे. आर्मेनिया आणि अझरबैजान यांच्यातील लष्करी संघर्ष सर्वश्रुत आहे. या संघर्षात अझरबैजानला तुर्की आणि पाकिस्तान या दोन्ही भारतद्वेष्ट्या देशांचा उघड पाठिंबा आहे. तुर्की, अझरबैजान आणि पाकिस्तान या देशांनी मिळून एक अघोषित इस्लामिक लष्करी गट तयार केला असून, तो आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर काश्मीरच्या मुद्द्यावरून भारतीय हिताला सातत्याने बाधा पोहोचवण्याचा प्रयत्न करतो. पाकिस्तानचे दहशतवादी आणि तुर्कीयेचे प्रगत ड्रोन्स अझरबैजानच्या मदतीला उभे राहिल्यावर, भारताने आर्मेनियाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला. 'आकाश' आणि 'पिनाक'सारखी विद्ध्वंसक शस्त्रे आर्मेनियाला देऊन, भारताने तुर्कीये – अझरबैजान – पाकिस्तानच्या अभद्र आघाडीला कठोर इशारा दिला आहे. तुम्ही आमच्या शत्रूंना मदत कराल, तर आम्ही तुमच्या शत्रूंना अशी अद्ययावत शस्त्रे देऊ की तुमचे अस्तित्वच धोयात येईल. आर्मेनिया हा भारताचा संरक्षण क्षेत्रात सर्वांत मोठा ग्राहक झाला आहे. कोट्यवधी डॉलर्सची शस्त्रास्त्रे, भारत आज आर्मेनियाला आत्मविश्वासाने पुरवत आहे. भारताची ही प्रगल्भ संरक्षण मुत्सद्देगिरी आर्मेनियापुरती किंवा युरेशियापुरती मर्यादित नाही. चीनला त्याच्याच भाषेत आणि त्याच्याच अंगणात उत्तर देण्यासाठी, भारताने आपल्या 'ॲक्ट ईस्ट पॉलिसी'अंतर्गत आग्नेय आशियाई देशांसोबतही सामरिक संबंध कमालीचे दृढ केले आहेत. दक्षिण चीन समुद्रात चीनच्या वाढत्या दादागिरीला चाप लावण्यासाठी, भारताने व्हिएतनामसोबत 'ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ' क्षेपणास्त्रांचा करार केला. व्हिएतनाम हा चीनचा पारंपरिक शत्रू. त्याला 'ब्रह्मोस'सारखे अस्त्र देऊन, भारताने चीनची डोकेदुखी वाढवली आहे. याशिवाय, इंडोनेशियासारख्या आणखी एका महत्त्वाच्या आशियाई देशासोबतही, शस्त्रास्त्रनिर्यातीची आणि विशेषतः 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्र देण्याची भारताची चर्चा आता अगदी अंतिम टप्प्यात आली आहे. फिलीपिन्सने याआधीच भारताकडून 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्रे खरेदी करून, आपल्या नौदलात तैनात केली आहेत. हे सर्व देश चीनच्या विस्तारवादी धोरणाने त्रस्त असून, त्यांना आता भारताच्या रूपाने एक खंबीर, लोकशाहीवादी आणि विश्वासार्ह सामरिक पाठीराखा मिळाला आहे. 'मेक इन इंडिया' या मोहिमेची सुरुवात झाल्यावर, देशातील काही विरोधी पक्षांनी, तसेच संकुचित वृत्तीच्या नेत्यांनी आणि पाश्चात्य अर्थतज्ज्ञांनी याची खिल्ली उडवली. भारत कधीही शस्त्रास्त्र निर्यातदार देश बनू शकत नाही, असाच त्यांचा दावा होता. मात्र, आज भारताच्या अर्थव्यवस्थेने आणि संरक्षण निर्यातीने जो उच्चांक गाठला आहे, त्याने या सर्व टीकाकारांची तोंडे कायमची बंद केली आहेत. आर्थिक पातळीवर २४.४० टक्क्यांची निर्यातवाढ आणि संरक्षण पातळीवर आर्मेनियापासून व्हिएतनामपर्यंत पसरलेला भारतीय शस्त्रास्त्रांचा दबदबा, या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आज जगातील कोणतेही राष्ट्र भारताच्या सामरिक आणि आर्थिक ताकदीकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत. भारत आता जागतिक राजकारणातील भूराजकीय समीकरणे आपल्या सोयीनुसार ठरवणारा, एक प्रमुख खेळाडू झाला आहे. येणारा काळ हा भारताचाच आहे.

# भाजपाचे आ. रमेशअप्पा कराड यांच्यावर जन्मदिनानिमित्ताने शुभेच्छांचा वर्षाव





**लातूर/प्रतिनिधी :** आध्यात्मीक, सामाजिक, शैक्षणिक कार्यासह, राजकारणात अग्रेसर राहून गोरगरीब सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देणारे, शेतकरी, शेतमजूराच्या न्यायहक्कासाठी संघर्ष करणारे भाजपाचे नेते लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे भाग्यविधाते आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने लातूर येथील प्रयाग'' या निवासस्थानी भाजपासह विविध राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून तर अनेकांनी समाज माध्यम व दुरध्वनीच्या माध्यमातून जन्मदिनाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या. आ. कराड मित्रपरिवाराच्या वतीने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अंगणवाडीतील कार्यकर्ती, मदतनीस आणि आशा सेविकांचा यथोचित सन्मान करण्यात आला. अभिष्टचिंतन सोहळ्यास ग्रामीण भागातील नागरीकांनी प्रचंड गर्दी केली होती. अनेक गावात ग्रामदैवतांची महापूजा करुन रमेशअपांना दीर्घाष्य लाभावे यासाठी कार्यकर्त्यांच्या वतीने महापूजा, आरती व प्रार्थना करण्यात आली.

गोरगरीब व सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी, शेतकरी शेतमजूराच्या न्यायहक्कासाठी सतत संघर्ष करणारे, गरजुंना वेळोवेळी मदत करणारे, कार्यकर्त्यांना बळ देवून मान आणि सन्मान मिळवून देणारे, हजारो कुटूंबांना आरोग्य सेवेच्या माध्यमातून दिलासा देणारे आणि सर्वांना आपलेसे वाटणारे आणि आध्यात्मीक, सामाजिक, शैक्षणिक कार्यासह, राजकारणात अग्रेसर राहून आपल्या कामाचा वेगळा ठसा निर्माण करणारे भाजपाचे नेते लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील कार्यसम्राट आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांचा शनिवार दि. ३० मे २०२६ रोजी जन्मदिवस मोठ्या उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. समाज प्रबोधनकार हभप निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे जन्म दिनाच्या पूर्व संध्येला २९ मे रोजी रात्री भादा सर्कल मधील मौजे समदर्गा येथे जाहीर कीर्तन झाले. या कीर्तनास हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता.

आ. रमेशअप्पा कराड मित्र परिवाराच्या वतीने लातूर येथील अंबाजोगाई रोड वरील एमआयटी परिसरातील ''प्रयाग'' या निवासस्थानी अभिष्ठचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळयाला लातूर ग्रामीण मतदार संघातील नव्हेतर संपूर्ण जिल्ह्यासह अनेक जिल्ह्यातील भाजपा व विविध पक्षातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि मित्रपरिवारांनी दिवसभरात आ. रमेशअप्पा कराड यांचा यथोचित सत्कार केला, पुष्पगुच्छ देवून, मिठाई



भरवून जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या. अभिष्ठचिंतन करण्यासाठी दिवसभर मोठी गर्दी झाली होती. ग्रामीण मतदार संघातील विविध गावागावातील महिला भजनी मंडळ उत्स्फुर्तपणे अभिष्ठचिंतन सोहळ्यात सहभागी होवून भजनी मंडळातील महिलांनी आप्पासाहेबांचा यशोचित सत्कार करुन जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या. बंजारा समाजातील पाचशे महिलांना अशोक राठोड यांच्या वतीने पारंपारीक बंजारा पोशाख वाटप करण्यात आला. शैक्षणिक साहित्याची तुला करण्यात आली. सकाळच्या वेळी रेणापूर येथील आदिशक्ती श्री रेणूका मातेसह लातूर ग्रामीण मतदार संघातील अनेक गावागावात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी ग्रामदेवतांचा अभिषेक, महापूजा व आरती करून आ. रमेशअप्पा कराड यांना दिर्घायुष्य लाभावे यासाठी प्रार्थना केली. तर अनेक ठिकाणी रक्तदान शिबीर, यासह विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. रेणापूर येथील ग्रामीण रुग्णालयासह इतर ठिकाणच्या रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.

भाजपा नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांना जन्मदिनानिमित्त केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहळ, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे पाटील, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण, जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री चंद्रकांतदादा पाटील, मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री गिरीश महाजन, मंत्री पंकजाताई मुंडे, मंत्री आकाश फुंडकर, मंत्री नितेश राणे, मंत्री बाबासाहेब पाटील, मंत्री मेघनाताई बोर्डीकर, माजीमंत्री सुधीर मुनगंटीवार, माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, माजीमंत्री आ. संजय बनसोडे, खा. धनंजय महाडिक, सुरजितसिंह ठाकुर, आ. चित्राताई वाघ, आ. प्रसाद लाड, आ. निरंजन डावखरे, आ. अमित गोरखे, आ. संदिप जोशी, आ. शंकर जगताप, आ. सचिन शेट्टी, आ. पराग अळवणी, आ. सुरेश खाडे, आ. मिहीर कोटेचा, आ. प्रविण दटके, आ. विक्रम काळे, आ. सुधीर पाटील, आ. नारायण कुचे, आ. प्रताप अडसर, आ. सुरेश धस, आ. प्रशांत ठाकूर, आ. चैनसुख संचेती, आ. संतोष दानवे, आ. संजय केणेकर, आ. राणाजगजितसिंह पाटील, आ. श्वेता महाले, आ. समाधान औताडे, आ. राजन नाईक, आ. महेश लांडगे, आ. श्रीजया चव्हाण, प्रदेश प्रवक्ते नवनाथ बन, गजानन घुगे, राम सातपुते, भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, अरविंद पाटील निलंगेकर यांच्यासह महाराष्ट्रातील अनेकांनी दुरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या.

जन्मदिनानिमित्ताने आ. रमेशअप्पा कराड यांना श्री. अघोर महाराज व इतर त्यांच्या सहकाऱ्यांनी मंत्रोपचारात शुभाशिर्वाद दिले. अभिष्ठचिंतन कार्यक्रम प्रसंगी तुळशीरामअण्णा कराड, काशिरामनाना कराड, सौ. संजिवनीताई कराड, राजेश कराड, सौ. शुभांगी कराड, विहार बोडके, सौ. ऋतुजा बोडके, भाजयुमो जिल्हाध्यक्ष ऋशिकेशदादा कराड, पृथ्वीराज कराड, रणवीर कराड यांच्यासह कराड परिवारातील अनेक सदस्य होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन चंद्रकांत कातळे यांनी केले.

अभिष्ठचिंतन सोहळ्यात आ. रमेशअप्पा कराड यांचे आ. अभिमन्यू पवार, माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे, शिवसेनेचे ॲड. बळवंत जाधव, प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी, गणेशदादा हाके, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा उषाताई पाटील तळेगावकर, बांधकाम सभापती ज्ञानेश्वर बिराजदार, महिला बालकल्याण सभापती शिवकन्या गोडभरले, जिप गटनेते रामचंद्र तिरुके, निलंगा पस सभापती डॉ. सुनिता वाघमारे, रेणापूर सभापती मोनिका सुर्यवंशी, देवणी सभापती अंकिता पाटील शिरुर अनंतपाळ सभापती संजय सुर्यवंशी, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष रमेशभाऊ राठी, ललितभाई शहा, लातूर अर्बन बँकेचे चेअरमन विशाल राठी, जिप सदस्य महादेव साळुंके, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने, हभप उद्धवबापू आपेगावकर, प्रदेश राष्ट्रवादीचे बबन भोसले, भाजपाचे दिलीपराव देशमुख, शैलेश लाहोटी, विक्रमकाका शिंदे, प्रदिप पाटील खंडापूरकर, युवा भिमसेनेचे पंकज काटे, शिवसेनेचे संतोष बेंबडे, भागवत सोट, रमाकांतबापू मुंडे, अशोककाका केंद्रे, शिवाजी केंद्रे, श्रीहरी मुंडे, त्र्यंबकआबा गुट्टे, वसंतराव डिघोळे, नाथसिंह देशमुख, बापूराव राठोड, अविनाश कोळी, सुभाष जाधव, स्वप्नील व्हते, देविदास काळे, दिग्विजय काथवटे, रागिणी यादव, प्रदिप मोरे, विक्रमसिंह चौहान, रोहिदास वाघमारे, बापूराव चामले, पप्पु गायकवाड, भारत चामले, सुशिलकुमार बाजपेयी, सुनिल उटगे, किरण उटगे, मुक्तेश्वर वाघदरे, दत्ताआबा पाटील अंबाजोगाईकर, राजाभाऊ औताडे, कमलाकर कोंपले, अच्युत गंगणे, भागवत गुट्टे, राजकुमार कलमे, सज्जन लोण्णाळे, गोविंद चिलकुरे, बालासाहेब शेप, बापूराव केंद्रे, रामेश्वर बद्दर, अरुण समुद्रे, जयप्रकाश दगडे, चंद्रकांत झरीकुंटे, शशिकांत पाटील, जावेद शेख, संजय देशपांडे, हारुण सय्यद, डी. एन. केंद्रे, विजय क्षिरसागर, गुंडाप्पा पाटील, धर्मपाल देवशेट्टे, अनंत गायकवाड, गिरीष पाटील, गणेश गवारे, दिपाताई गित्ते, अर्जुन जाधव, जगदिश कुलकर्णी, वैशाली लोंढे, क्रेडाईचे उदय पाटील, संतोष हात्ते, महेश नावंदर, जयकांत गित्ते, गोपाळ जोशी, अभिजित देशपांदे, किशोर कुलकर्णी, प्रकाश सोनवणे, संतोष वाघमारे, सुशांत पाटील, महेश पाटील, शंकर रोडगे, चंद्रभान जाधव, प्रकाश पाटील, रत्नाकर औसेकर, बाबू खंदाडे, राजेंद्र लोदगेकर, व्यंकट पन्हाळे, रोहिणी देशमुख, अभिमान वायबसे, बाबाराव बारवाड, राजपाल भंडे, काशिनाथ गरीबे, संजय अग्रवाल, शिवम देवशेटवार, मस्तान शेख, ॲड. अविनाश इरपतगिरे, ॲड. मनोज कराड, ॲड. किरण बडे, ॲड. शिवाजी नागरगोजे, ॲड. केदार, इंद्रजित केंद्रे, सुधाकर भताने, शंकर गुट्टे, ॲड. मोहन सिरसाट, पद्माकर चिंचोलकर, महेंद्र गोडभरले, अभिषेक अकनगिरे, अनिल भिसे, पांडूरंग बालवाड, ॲड. दशरथ सरवदे, उद्धव काळे, सुरज शिंदे, प्रताप पाटील, शरद दरेकर, राजकिरण साठे, बन्सी भिसे, वैभव सापसोड, डॉ. बाबासाहेब घुले, गणेश हेड्डा, महेंद्र जाधवर, प्रा. रघुनाथ केंद्रे, सुनिल होनराव, हणमंत देवकते, संतोष कोटलवार, बालासाहेब गुट्टे, जयंत गंगणे महाराज, दिलीप धोत्रे, विष्णु गोरे, ऋषिकेश बद्दे, व्यंकटराव आनामे मामा, विष्णु मदने, रवि सुर्यवंशी, नागनाथ गित्ते, सुभाष धोत्रे, अमोल पाटील, बबन चोले, अमर भोसले, एकनाथ काळे, सुनिल सुर्यवंशी, भालचंद्र सुर्यवंशी, डॉ. बोरगावकर, शिवासिंह सिसोदिया, श्रद्धा जगताप, हेमा येळे, पुजा कांबळे, शितल पाटील, ललिता कांबळे, अनुसया फड, सुरेखा पुरी, जया काबरा, शिला आचार्य, लता भोसले, शृती सवई, सविता खाडप, जणाबाई साखरे, उषा रोडगे, सुरेखा मुळे, सिमा करपे, कल्पना मोरे, संजय विरुळे, वसंत करमुडे, ॲड. धनराज शिंदे, संजय ठाकूर, गोपाळ पाटील, रमेश पाटील, गोविंद गिरी, युवराज पाटील, श्रीकृष्ण जाधव, उमेश सोमानी, ज्ञानोबा भिसे, दिपक वांगसकर, अनंत चव्हाण, मुन्ना गुरले, विजय चव्हाण, प्रा. धनंजय बिक्कड, विश्वास कावळे, ॲड. श्रीकांत बोराडे, काशीनाथ ढगे, अच्युत कातळे, दत्ता सरवदे, महेश गाडे, अशोक राठोड, उत्तम चव्हाण, महेश कणसे, लक्ष्मण यादव, संजय डोंगरे, धम्मानंद घोडके, नारायण राठोड, रविंद्र नागरगोजे, माधव घुले, श्रीमंत नागरगोजे, संतोष चव्हाण, किशन क्षिरसागर, लहु शेवाळे, भागवत गित्ते, राजु आलापुरे, पार्वती सोमवंशी, बालाजी दुटाळ, शंकर चव्हाण, प्रशांत शिंदे, श्रीकांत कुंभार, सिद्धेश्वर मामडगे, माणिक आलुरे, बाबुराव कस्तुरे, भिमराव मुंडे, श्रीनिवास उगिले, विठ्ठल बोडके, प्रविण कोतवाड, मनसेचे बाळासाहेब मुंडे, भागवत शिंदे, नंदकुमार साळुंके, अमोल गित्ते, अजित पाटील, राज जाधव, बळवंत कराड, प्रकाश जाधव, राहुल नागरगोजे, रामानंद मुंडे, बाबा भिसे, प्रशांत मोटे, पिंटू डोंगरे, नरसिंग सुरवसे, दिलीप पाटील, लक्ष्मण खलंग्रे, गोविंद मुंडे, किरण मुंडे, समाधान कदम, बालाजी गवळी, वैजनाथ हाराळे, हणमंत गव्हाणे, पुंडलिक बेंबडे, सुभाष राठोड, संतोष राठोड, बालासाहेब कदम, दिलीप चव्हाण, भैरवनाथ पिसाळ, ईश्वर बुलबुले, जगदिश माळी, ज्ञानेश्वर जुगल, नरसिंग यलगटे, नवनाथ मुरकुटे, यांच्यासह लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावातील वाडीवस्तीतील भाजपा व इतर विविध पक्षातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, व्यापारी, प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते त्याचबरोबर विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी आदींनी आ. रमेशअप्पा कराड यांना प्रत्यक्ष भेटून यथोचित सत्कार करुन जन्मदिनानिमित्ताने शुभेच्छा दिल्या.

# लाखो लोकांची प्रतीक्षा संपली!, केरळमध्ये मान्सूनचे आगमन; मुसळधार पावसाचा अंदाज

**तिरुवनंतपुरम/वृत्तसंस्था :** संपूर्ण भारतातील लाखो लोक केरळमध्ये दरवर्षी होणाऱ्या नैऋत्य मान्सूनच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत असतात आणि अखेर त्यांची ही प्रतीक्षा संपली आहे. हवामान विभागाने आज सोमवारी मान्सून आता केरळच्या किनारपट्टीवर दाखल झाल्याचं जाहीर केलंय; यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या जनतेला मोठा दिलासा मिळालाय. या घोषणेसोबतच विभागाने असा इशाराही दिला आहे की, येत्या काही दिवसांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने (घ्श) असा अंदाज वर्तवला आहे की, मान्सूनच्या आगमनामुळे संपूर्ण राज्यात जोरदार पाऊस होईल. भारतातील मान्सूनच्या प्रगतीवर देशभरातून बारकाईने लक्ष ठेवले जात आहे; कारण केरळमधील मान्सूनचे आगमन हा उर्वरित देशात त्याच्या पुढील वाटचालीसाठी एक महत्त्वाचा निकष मानला जातो. मुसळधार पावसाची शक्यता लक्षात घेऊन घ्श ने या आठवड्यातील विविध दिवशी सात जिल्ह्यांसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी केलेत.

बुधवार आणि गुरुवारकरिता 'ऑरेंज अलर्ट' जारी : विभागाच्या माहितीनुसार, केरळमधील अलाप्पुझा, कोट्टायम, एर्नाकुलम, त्रिशूर आणि मलप्पुरम या जिल्ह्यांसाठी बुधवार आणि गुरुवारकरिता 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आलाय; तर पतनमथिट्टा आणि कोझिकोड या जिल्ह्यांसाठी गुरुवारकरिता हा अलर्ट लागू असेल. हवामान विभागाच्या अधिकाऱ्यांनी पूर किंवा इतर संकटांची अधिक शक्यता असलेल्या (न्ल्त्हीरंत) भागात राहणाऱ्या रहिवाशांना अत्यंत सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे. दरम्यान, हवामान तज्ज्ञांनी असा इशारा दिला आहे की, या जिल्ह्यांमधील काही विशिष्ट ठिकाणी अल्पावधीतच ११ ते २० सेंटीमीटरपर्यंत पाऊस पडू शकतो.

डोंगराळ भागात दरडी कोसळण्याचा धोका : विशेष म्हणजे अशा प्रकारच्या मुसळधार पावसामुळे शहरी भागात अचानक



पूर (इत्रेप् षत्ददे्) येण्याचा आणि डोंगराळ भागात दरडी कोसळण्याचा धोका वाढतो; यामुळे आपत्ती व्यवस्थापन संस्थांनी आपले निरीक्षण आणि पूर्वतयारीचे उपाय अधिक तीव्र केलेत. राज्याच्या मोठ्या भागात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता दर्शवणारे 'यलो अलर्ट' देखील इतर अनेक जिल्ह्यांसाठी जारी करण्यात आले आहेत. मान्सूनच्या आगमनामुळे केरळच्या किनारपट्टीवर हवामान खराब होण्याची आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे.

समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये : हवामान विभागाच्या अधिकाऱ्यांनी मच्छीमारांना असा सल्ला दिला आहे की, जोपर्यंत हवामानाची स्थिती सुधारत नाही, तोपर्यंत त्यांनी समुद्रात मासेमारीसाठी जाऊ नये. अनेक आठवड्यांच्या उकाड्यापासून दिलासा मिळण्याची लोक आतुरतेने वाट पाहत असताना राज्यात मान्सूनपूर्व तयारीला वेग देण्यात आलाय, ज्यामध्ये पूर येण्याचा धोका कमी करण्यासाठी गटारे, कालवे आणि जलमार्गांची साफसफाई करण्याच्या कामाचा समावेश आहे. अत्यंत तीव्र उष्म्याचा काळ लोटल्यानंतर, येत्या काही दिवसांत मान्सूनच्या पहिल्या व्यापक सरींच्या आगमनामुळे केरळच्या निसर्गसौंदर्यात आमूलाग्र बदल घडून येण्याची अपेक्षा आहे आणि याद्वारे संपूर्ण भारतातील कृषी आणि जलसंपदांना आधार देणाऱ्या हंगामी पावसासाठी अनुकूल वातावरण निर्माण होईल.

## विविध वृत्त...

### आज ज्येष्ठ नेते बाबुरावजी गालफाडे यांच्या ६४ वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमाचे आयोजन



**केज/प्रतिनिधी :** बहुजन क्रांती मोर्चाचे बीड जिल्हा संयोजक ज्येष्ठ नेते बाबुरावजी गालफडे यांच्या ६४ व्या वाढदिवसानिमित्त दिनांक २ जून २०२६ रोजी केज येथील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळाचे वाटप यासह विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास सर्व संघटना, पक्षाचे पदाधिकारी आणि मित्रपरिवाराने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक यांच्या वतीने करण्यात आले आहे. मंगळवार रोजी सकाळी ठीक १०-०० वाजता केज येथील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळाचे वाटप, दुपारी १२-३० वाजता केज शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौका जवळ प्राईम हॉटेल येथे ज्येष्ठ नेते बाबुरावजी गालफडे यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा करण्यात येणार आहे.

### कुंबेफळ येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर" जयंती साजरी



**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील कुंबेफळ येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा शाळेत ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर'' जयंती साजरी करण्यात आली. दि.३१ मे २०२६ रविवार रोजी ''पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर '' यांच्या प्रतिमेस जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज या शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक राजाभाऊ कदम यांनी पुष्पहार अर्पण करून पुजन केले व अभिवादन करून त्यांची जयंती साजरी करण्यात आली.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यात चौंडी येथे झाला.आईचे नाव सुशिलाबाई व वडील माणकोजी शिंदे हे असुन पतीचे नाव खंडेराव असुन त्या माळव्यात तत्त्वज्ञानी महाराणी म्हणून ओळखल्या जातात.त्या स्वतः सैन्याचे नेतृत्व करत होत्या तसेच त्या उचित न्यायदान करत असत.अशा या शुर वीर-पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या कार्याबद्दल माहिती आपल्या प्रास्ताविकात या शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक राजाभाऊ कदम यांनी सांगितली.यावेळी राजाभाऊ कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज, डॉ. रामकिशन मुळे,संदीप ठोंबरे,आकाश लोंढे, श्रीमती अंजली उटीकर मॅडम,श्रीमती निलावती भोरे मॅडम, आबासाहेब धपाटे,राहुल बचुटे व विद्यार्थी उपस्थित होते.

### सर्वोच्च न्यायालयाला ५ नवीन न्यायाधीश मिळाले; सरकारने दिली मंजुरी

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाला पाच नवीन न्यायाधीश मिळालेत. सोमवारी केंद्र सरकारने चार राज्यांच्या उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधीश आणि सर्वोच्च न्यायालयातील एका ज्येष्ठ महिला वकिलांची देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी दिलीय. केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी स्वत: ही माहिती दिली. यापूर्वी एका अध्यादेशाद्वारे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या नुकतीच ३४ वरून ३८ पर्यत वाढवण्यात आली होती. या पाच न्यायाधीशांच्या नियुक्तीनंतर सर्वोच्च न्यायालयाची सध्याची न्यायाधीश संख्या आता ३७ झाली आहे.

तत्पूर्वी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील सर्वोच्च न्यायालयाच्या 'कॉलेजियम'ने या नावांबाबतच्या शिफारसी केंद्र सरकारकडे पाठवल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाल्यामुळे ज्येष्ठ वकील व्ही. मोहना यांनी आता इतिहास घडवला आहे. व्ही. मोहना यांच्याव्यतिरित्तफ न्यायमूर्ती शील नागू (पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश), न्यायमूर्ती चंद्रशेखर (मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश), न्यायमूर्ती संजीव सचदेवा (मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश) आणि न्यायमूर्ती अरुण पल्ली (जम्मू आणि काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश) यांच्या नियुक्त्यांनाही मंजुरी मिळालीय. या नियुक्त्यांकडे केवळ रिक्त पदे भरण्याची एक प्रक्रिया म्हणून पाहिले जात नाही. या न्यायिक नियुक्त्या करताना ज्येष्ठता, गुणवत्ता, प्रादेशिक प्रतिनिधित्व आणि विविधता यांसारख्या बाबींचाही विचार करण्यात आला आहे. पाच नवीन न्यायाधीशांची ही नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाची संस्थात्मक क्षमता बळकट करण्याच्या आणि न्यायव्यवस्थेची परिणामकारकता वाढवण्याच्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जाते.

# स्थानिक गुन्हे शाखेच्या धाडसी कारवाईमुळे गुटखा माफियांचे धाबे दणाणले!

## एका दिवसात तीन ठिकाणी पोलिसांच्या धाडी;१० लाख ३ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त



**केज/प्रतिनिधी :** अवैद्य धंद्यांना घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने धाडसी पाऊल उचलले असून जनतेच्या आरोग्याशी निर्माण करणारा गुटखा आणि त्याची त्याची विक्री करणारे गुटखा माफिया यांच्या विरोधात पोलीस प्रशासनाने कडक पावले उचलली असून स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्याची बीड जिल्ह्यात विविध तीन ठिकाणी धाडसी कारवाया केल्या आहेत.

पोलीस अधीक्षक बीड यांनी जिल्ह्यातील अवैद्य धंद्याचे समूळ उच्चटन करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यावरून दि.३१ मे २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेने विशेष मोहीम राबवुन तीन विशेष पथके तयार करून त्यांनी पोलीस ठाणे बीड शहर, पोलीस ठाणे युसूफ वडगाव व पोलीस ठाणे सिरसाळा हद्दीतील अवैद्य गुटखा साठवणुक,विक्री व वाहतुक करणाऱ्या इसमाची गोपनिय माहिती काढुन पोलीस ठाणे बीड शहर हद्दीतील बसस्थानका समोर एक इसम अवैद्य गुटखा विक्री करण्यासाठी जवळ बाळगतांना मिळुन आला. त्याच्या ताब्यातुन २ लाख २१हजार रूपयाचा गुटखा जप्त करण्यात आला.

पोलीस ठाणे युसूफवडगाव हद्दीत एक इसम त्यांच्या ताब्यातील स्वीप्ट कारमध्ये अवैद्य गुटखा वाहतुक करीत असतांना मिळुन आला. त्याच्या ताब्यातुन गुटखा व स्वीट कार असे एकुण ४ लाख ४५ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस ठाणे सिरसाळा हद्दीतील पोहनेर गावात एक इसम त्याच्या ताब्यातील अँटोरिक्षामध्ये गुटखा भरून त्याची विक्री करण्यासाठी घेवुन जात असतांना मिळुन आला. त्याच्या ताब्यातुन ३लाख ३२ हजार ८००रूपयाचा गुटखा व टेम्पो जप्त करण्यात आला आहे.

वरील तिन्ही ठिकाणी छापा मारुन कारवाई करून १० लाख ३ हजार ८० रूपयाचा गुटख्याचा मुद्देमाल व वाहन जप्त करून संबधीत पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. सदरची कार्यवाही प्र.पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम,अप्पर पोलिस अधीक्षक बीड व पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने,पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे,पोह/राहुल शिंदे,पोह/विकास राठोड, पोह/अशोक दुबाले, पोह/अर्जुन यादव,पोह/महेश जोगदंड,पोह/राजु पठाण, पोह/दिलीप गिते,पोह/बप्पा घोडके, पोह/रामचंद्र केकान, पोह/गोविंद भताने, पोअ/सचिन आंधळे, पोअ/मनोज परजणे, पोअ/अश्फाक सय्यद, चापोह/नितीन वडमारे, चापोह/गणेश मराडे, यांनी मिळून कारवाई केली आहे.

## साबला येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी



**केज/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासन,महिला व बाल विकास विभाग,मुंबई यांच्या आदेशानुसार ग्रामपंचायत कार्यालय,साबला.येथे सरपंच जनाबाई नरहरी काकडे,ग्रामपंचायत सदस्या आश्रुबाई श्रीमंत काकडे , पार्वती महादेव नाईकनवरे यांच्या हस्ते प्रथम '' पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर '' यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुढील कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त. गावातील ज्या महिला सामाजिक, सांस्कृतिक,शैक्षणिक,धार्मिक,आरोग्य विषयक समाजकार्यात उत्कृष्ट काम करत असलेल्या महिलांना ग्रामपंचायत कार्यालय,साबला.सरपंच जनाबाई नरहरी काकडे,ग्रामपंचायत सदस्या आश्रुबाई श्रीमंत काकडे,पार्वती महादेव नाईकनवरे यांच्या शुभ हस्ते सुनिता अशोक काकडे,अनिता रामराजे शिंदे,छायाबाई बारिकराव काकडे,मंगल बालाजी काकडे,आशाबाई अंकुश मुळे,राधा राम काकडे,सारिका विजय नाईकनवरे,सुरेखा विष्णू कटारे,सुरेखा श्रीराम राऊत,आम्रपाला सुधीर सरवदे,मिरा संभाजी घाडगे,आरती अनिल सरवदे वरील इत्यादी महिलांना '' पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार '' देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच यावेळी आंगणवाडी मदतनिस वैशाली विजय सरवदे,केशरबाई अभिमान सरवदे,ऋतुजा ईश्वर नाईकनवरे,ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ,पोलिस पाटील अविनाश गुलाब काकडे,समाजसेवक नरहरी काकडे,रामराजे शिंदे,गणेश कटारे,अशोक काकडे,बारिकराव काकडे,योगिराज मुळे,आश्रुबा नाईकनवरे,हनुमंत मुळे,माऊली नाईकनवरे,रामराजे काकडे,बाबासाहेब काकडे,शाम काकडे,फोटो ग्रापर राहुल मुळे, नितिन काकडे तसेच या कार्यक्रमासाठी गावातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## धक्कादायक! लग्नास नकार दिल्याने अल्पवयीन मुलीची आत्महत्या, आरोपीवर गुन्हा दाखल

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील सहकारनगर परिसरात अल्पवयीन मुलीच्या आत्महत्येची धक्कादायक घटना समोर आली असून, या प्रकरणी एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रेमसंबंधातून लग्नाचे आश्वासन देऊन नंतर नकार दिल्यामुळे मानसिक धक्का बसलेल्या मुलीने टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुलै २०२५ ते २ जानेवारी २०२६ या कालावधीत संबंधित अल्पवयीन मुलगी आणि समीर महादेव रणदिवे (वय २२, रा. फोडशिरस, ता. माळशिरस, जि. सोलापूर) यांच्यात प्रेमसंबंध सुरू झाल्याचे तपासात समोर आले आहे. मुलगी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही आरोपी तिच्या संपर्कात राहिला आणि वारंवार भेटी घेत असल्याचे पोलिसांनी सांगितले. तक्रारीनुसार, आरोपीने मुलीला लग्नाचे आश्वासन दिले होते. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून मुलीने भविष्यासंदर्भात अनेक अपेक्षा निर्माण केल्या होत्या. मात्र काही काळानंतर लग्नाचा विषय पुढे आल्यानंतर आरोपीने लग्नास नकार दिल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे मुलीला मोठा मानसिक धक्का बसला.

दरम्यान, मुलगी घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आली. सुरुवातीला या घटनेची अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली होती. मात्र तपासादरम्यान आत्महत्येमागील कारणांचा शोध घेत असताना प्रेमसंबंध आणि लग्नाच्या आश्वासनाचा मुद्दा समोर आला. यानंतर मुलीच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे सहकारनगर पोलीस ठाण्यात समीर रणदिवे याच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त करणे आणि फसवणुकीसंदर्भातील गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून आरोपीचा शोध घेतला जात आहे. या प्रणानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## मुंबई विमानतळावर सोन्याच्या तस्करीचा मोठा पर्दाफाश; दुबईहून आलेल्या प्रवाशांकडून ४.१९ कोटींचे सोने जप्त

**मुंबई/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाने सोन्याच्या तस्करीविरोधात मोठी कारवाई करत दुबईहून आलेल्या दोन प्रवाशांकडून तब्बल ४.१९ कोटी रुपये किमतीचे २.६ किलो सोने जप्त केले आहे. या कारवाईमुळे आंतरराष्ट्रीय तस्करीच्या जाळ्याचा पुन्हा एकदा पर्दाफाश झाला असून, या प्रकरणामागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेण्यासाठी तपास यंत्रणांनी मोहीम सुरू केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई सीमाशुल्क विभागाच्या हवाई गुप्तचर पथकाला दुबईहून मोठ्या प्रमाणात सोने तस्करी करून भारतात आणले जाणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानंतर अधिकाऱ्यांनी विमानतळाच्या आगमन विभागात सापळा रचून संशयित प्रवाशांवर नजर ठेवली.

# केज शहरात जय गजानन कॅम्पुटर ट्रेनिंग सेंटरचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांनी बदलत्या काळानुसार संगणकीय ज्ञान आत्मसात करणे काळाची गरज-डॉ. हारुणभाई इनामदार

**केज/प्रतिनिधी :** केज शहरातील अहिल्यादेवी नगर भागातील उमरी रोड, तोंडसे कॉम्प्लेक्स येथे जय गजानन कम्प्युटर ट्रेनिंग सेंटरचे उद्घाटन नगराध्यक्षा डॉ.सौ.सीताताई बनसोड व राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा गटनेते डॉ.हारूणभाई इनामदार आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून गटनेते डॉ.हारूणभाई इनामदार नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक बाळासाहेब गाढवे, सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, पत्रकार तात्या गवळी, अभिमान (बापू) बचुटे, विनोद गुंड, इंटेल कम्प्युटर सेंटरचे प्रमुख गणेश सत्वधर यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम गटनेते डॉ.हारूणभाई इनामदार व नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले.

यावेळी भीमाशंकर तोंडसे सर व त्यांच्या परिवाराकडून उपस्थित मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून भीमाशंकर तोंडसे सर यांच्या जय गजानन कम्प्युटर ट्रेनिंग सेंटर या नवीन व्यवसायाला शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना जेष्ठ नेते डॉ. हारुणभाई इनामदार म्हटले की, विद्यार्थ्यींनी बदलत्या काळानुसार बदलत संगणकीय युगात संगणकीय ज्ञान आत्मसात करण्याची काळाची गरज आहे. अहिल्यादेवी नगर, वकीलवाडी, समता नगर भागासह शहरातील मुली व महिलांना या कम्प्युटर सेंटरचा मोठा फायदा होणार आहे. भीमाशंकर तोंडसे सरांनी हा व्यवसाय चालू केल्याने या परिसरातील व शहरातील तरुण युवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि महिलांना याचा फायदा होईल. आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये संगणकीय ज्ञान अवगत असणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन डॉ. इनामदार यांनी केले आहे.

याप्रसंगी बोलताना नगराध्यक्षा डॉ. सौ.सीताताई बनसोड म्हणाले की, सध्या केज शहराची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याने मुली महिलांना जास्त बाहेर पडता येत नाही. त्याचबरोबर संगणकीय ज्ञान असणे आवश्यक आहे. जय गजानन कॅम्पुटर ट्रेनिंग सेंटर मुळे मुली व महिलांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. भीमाशंकर तोंडसे सर यांनी मुली व महिलांसाठी खास करून त्यांच्या या ट्रेनिंग सेंटर मध्ये चांगली सोय केलेली आहे.

पुढे बोलताना सौ. बनसोड म्हणाले की, या भागातील व शहरातील मुली व महिलांनी या ट्रेनिंग सेंटर मध्ये येऊन संगणकीय ज्ञान घेऊन विविध क्षेत्रांमध्ये आपले नाव लौकिक करावे. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भीमाशंकर तोंडसे यांनी केले.

आपल्या प्रस्ताविकात बोलताना भीमाशंकर तोंड असे म्हणाले की, आम्ही संगणकीय क्षेत्रातील वेगवेगळे २५० पेक्षा अधिक कोर्सेस उपलब्ध केलेले आहेत. या आमच्या ट्रेनिंग सेंटर मध्ये विद्यार्थी-विद्यार्थिनी व महिला यांची कसल्याही प्रकारची गैरसोय होणार नाही. तरी शहरातील विद्यार्थी विद्यार्थिनी आणि महिलांनी याचा लाभ घ्यावा. असे त्यांनी आवाहन केले आहे.



यावेळी पी.पी.जाधव सर, गणेश तोंडसे, मंगेश सातपुते, बाळू दहिरे, रियाज शेख, प्रतीक भोसले, फुलचंद गाढवे, गणपत बावणे, धनु मुतळे यांच्यासह जीवन शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जुन्या वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसवण्यासाठी ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ; १ जुलैपासून वायुवेग पथकाद्वारे होणार कडक कायदेशीर कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एचएसआरपी) बसवण्यासाठी यापूर्वी दिनांक ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती, परंतु अद्यापही राज्यातील अनेक वाहनांवर एचएसआरपी प्लेट्स बसवल्या नसल्याचे आढळून आल्यामुळे प्रशासनाने आता या जुन्या वाहनांना क्रमांक पाटी बसविण्यासाठी ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

या अंतिम मुदतीनंतर, म्हणजेच ०१ जुलै २०२६ पासून एचएसआरपी प्लेट न बसविणाऱ्या सर्व जुन्या व नव्या वाहनांवर वायुवेग पथकाद्वारे कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, मात्र ज्या वाहन मालकांनी ३० जून २०२६ पर्यंत एचएसआरपी प्लेट बसवण्यासाठी पुढील अपॉइंटमेंट घेतली आहे, अशा वाहनांवर कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये असे स्पष्ट करण्यात आले आहे.

परिवहन आयुक्त यांच्या कार्यालयीन परिपत्रकानुसार, एचएसआरपी प्लेट न बसविणाऱ्या वाहन मालकांचे वाहन हस्तांतरण आणि वित्त बोजा चढविणे किंवा उतरविणे इत्यादी कामांवर आधीच निर्बंध लागू करण्यात आले आहेत. यापुढे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांची पुनर्नोंदणी, वाहनात बदल करणे आणि परवाना नूतनीकरण इत्यादी सर्व महत्त्वाची कामे (योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण वगळून) थांबविण्यात यावीत, असे निर्देश परिवहन आयुक्तांनी दिले आहेत. या पार्श्वभूमीवर, वाहनधारकांनी मुदतीनंतर होणारी कायदेशीर कारवाई आणि प्रशासकीय अडचणी टाळण्यासाठी आपल्या वाहनांवर एचएसआरपी प्लेट बसविण्याची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहन लातूर प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयामार्फत प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

## महाराष्ट्राच्या डिजिटल भविष्यास मोठी चालना

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या डिजिटल पायाभूत सुविधांना मोठी चालना देणारी महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. ऑस्ट्रेलियास्थित डेटा सेंटर कंपनी अगीऊील्हझ चे मुख्य कार्यकारी अधिकारी रॉबिन खुडा यांचे महाराष्ट्रात स्वागत करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी रायगड जिल्ह्यातील पेन ग्रोथ सेंटर येथे उभारण्यात येणाऱ्या भव्य डेटा सेंटर प्रकल्पासाठी जमीन वाटपाच्या उद्देशपत्राची देवाणघेवाण झाल्याची माहिती दिली. या प्रकल्पासाठी तब्बल २ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार असून डेटा सेंटरची क्षमता ३ गिगावॅट इतकी असणार आहे. राज्यातील डिजिटल अर्थव्यवस्था, डेटा स्टोरेज आणि तंत्रज्ञान क्षेत्राच्या विकासासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार असल्याचे मानले जात आहे.मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे सांगितले की, रायगडच्या पेन ग्रोथ सेंटर (ऑरेंज सिटी) येथे प्रस्तावित डेटा सेंटरमुळे महाराष्ट्राला जागतिक डेटा इन्फ्रास्ट्रक्चर नकाशावर अधिक मजबूत स्थान मिळेल. या गुंतवणुकीमुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्यासह अत्याधुनिक डिजिटल सुविधा विकसित होणार आहेत.

विशेष म्हणजे, जगातील आघाडीची गुंतवणूक कंपनी ब्लॅकस्टोन या प्रकल्पाला पाठबळ देत आहे. त्यामुळे महाराष्ट्रात डिजिटल पायाभूत सुविधांच्या विकासाला आणखी वेग मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या बैठकीला भारतातील ऑस्ट्रेलियाचे वाणिज्यदूत पॉल मर्फी हे देखील उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांच्या उपस्थितीबद्दल आभार व्यक्त करत भारत–ऑस्ट्रेलिया आर्थिक सहकार्य अधिक बळकट होत असल्याचे नमूद केले. राज्यात मोठ्या प्रमाणावर परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात असून, महाराष्ट्राला देशातील प्रमुख डिजिटल आणि डेटा सेंटर हब बनविण्याच्या दिशेने हे आणखी एक मोठे पाऊल असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

## लग्नानंतर काही मिनिटांतच काळाचा घाला! हेलिकॉप्टर अपघातात भारतीय वंशाच्या नवरदेवाचा मृत्यू; वधूच्या डोळ्यांसमोरच घेतला अखेरचा श्वास

जॉर्जिया: आयुष्याच्या नव्या प्रवासाची स्वप्ने पाहणाऱ्या एका नवविवाहित जोडप्यावर लग्नानंतर अवघ्या काही मिनिटांत दु:खाचा डोंगर कोसळला. अमेरिकेतील जॉर्जिया राज्यात नवदाम्पत्याला घेऊन जाणारे हेलिकॉप्टर कोसळल्याने भारतीय वंशाच्या तरुणाचा मृत्यू झाला, तर त्याची पत्नी गंभीर जखमी झाली. या भीषण अपघातात हेलिकॉप्टरच्या पायलटलाही जीव गमवावा लागला. मृत तरुणाची ओळख डेव्ह फिजी अशी असून तो अटलांटा येथे राहत होता आणि डेल्टा एअरलाइन्समध्ये पायलट म्हणून कार्यरत होता. त्याची पत्नी जेसनी सध्या रुग्णालयात उपचार घेत आहे. शुक्रवारी डॉसन काउंटीतील डॉसनव्हिल परिसरात हा अपघात झाला. डेव्ह आणि जेसनी यांनी अपघाताच्या काही तासांपूर्वीच 'द रिव्हियर' या प्रसिद्ध विवाहस्थळी विवाहबंधनात अडकत नव्या आयुष्याची सुरुवात केली होती. या विवाह सोहळ्यासाठी शेकडो पाहुणे उपस्थित होते आणि कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण होते. मात्र, लग्नानंतर नवविवाहित जोडपे हेलिकॉप्टरने पीचट्री–डेकाल्ब विमानतळाकडे रवाना होत असताना नियतीने वेगळेच काही ठरवले होते. अटलांटातील एका आलिशान हॉटेलमध्ये मुक्काम करण्याचा त्यांचा बेत होता. परंतु प्रवासादरम्यान हेलिकॉप्टरचा भीषण अपघात झाला. डेव्ह फिजीचे आई–वडील जॉर्ज आणि फीबा फिजी हे मूळचे केरळमधील एर्नाकुलम जिल्ह्यातील मुवट्टुपुझा येथील रहिवासी आहेत. अनेक वर्षांपूर्वी त्यांनी अमेरिकेत स्थलांतर केले होते. तर जेसनीच्या कुटुंबाची मुळेही केरळमधील अलप्पुझा जिल्ह्याशी जोडलेली आहेत.

# उमंग सेंटरच्या कार्याने आयुक्त सत्यजित बडे भारावले

## दिव्यांग मुलांसाठीच्या नाविन्यपूर्ण सेवांचे तोंडभरून कौतुक

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य दिव्यांग सक्षमीकरण आयुक्त सत्यजित बडे यांनी लातूर येथील 'उमंग ऑटिझम आणि पुनर्वसन केंद्रा'ला सदिच्छा भेट देत केंद्रामार्फत दिव्यांग बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. केंद्रातील नाविन्यपूर्ण सेवा, अत्याधुनिक सुविधा आणि दिव्यांग मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांनी ते विशेष प्रभावित झाले. भेटीदरम्यान आयुक्त बडे यांनी दिव्यांग बालकांशी, त्यांच्या पालकांशी तसेच केंद्रातील डॉक्टर, थेरपिस्ट आणि कर्मचाऱ्यांशी मनमोकळा संवाद साधला. पालकांच्या अडचणी, अपेक्षा आणि समस्या जाणून घेत त्यांच्या भावना समजून घेतल्या. यावेळी अनेक पालकांनी 'उमंग'मुळे आपल्या मुलांच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल आयुक्तांसमोर मांडला. उमंग सेंटरमध्ये सुरू असलेल्या विविध थेरपी सेवा, स्पेशल स्कूल, थेरपी व्हॅन, अत्याधुनिक सेंसरी पार्क तसेच मराठवाड्यातील एकमेव नाविन्यपूर्ण हायड्रोथेरपी प्रकल्पाची त्यांनी





प्रत्यक्ष पाहणी केली. या सर्व सुविधा पाहून त्यांनी ''दिव्यांग मुलांसाठी इतक्या समर्पितपणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून कार्य करणारे केंद्र दुर्मीळ आहे,'' असे गौरवोद्गार काढले. यावेळी प्रसिद्ध बाल मेंदू विकार तज्ज्ञ डॉ. प्रशांत उटगे यांच्या कार्याचाही त्यांनी विशेष गौरव केला. दिव्यांग क्षेत्रात स्वतःला पूर्णतः झोकून देत हजारो कुटुंबांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करणाऱ्या डॉ. उटगे यांना त्यांनी ''देवमाणूस'' अशी भावनिक उपाधी दिली. दिव्यांग मुलांच्या पुनर्वसनासाठी त्यांच्या अथक सेवाभावाचे आणि समर्पणाचे त्यांनी तोंडभरून कौतुक केले. भेटीदरम्यान आयुक्तांनी राष्ट्रीय न्यासामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'निरामय' आरोग्य विमा योजनेची सविस्तर माहिती घेतली. या योजनेमुळे अनेक दिव्यांग लाभार्थ्यांना झालेल्या प्रत्यक्ष फायद्याचे त्यांनी कौतुक केले. तसेच या योजनेचा लाभ अधिकाधिक दिव्यांग बांधवांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. यावेळी उमंग सेंटरतर्फे निरामय योजनेतील लाभरकमेची वाढ करण्याबाबत आयुक्तालय स्तरावरून राष्ट्रीय न्यासाकडे पाठपुरावा करण्याची विनंती करण्यात आली. या प्रसंगी पुणे विभागाचे दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी पी. एस. कांबळे, लातूरचे समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे राजू गायकवाड व बालाजी वाकडे, उमंगचे प्रकल्प संचालक किरण उटगे, व्यवस्थापक ॲड. श्रीहरी गोरे, एचआर व प्रशासन व्यवस्थापक रामेश्वर जाधव, डॉ. श्रीशैल्यम तलारी, डॉ. वैभव उटगे, डॉ. अर्जुन राठोड, डॉ. वैष्णवी शिंगण, डॉ. प्रवीण राठोड, डॉ. प्रतीक केंद्रे, गणेश डोंगरे यांच्यासह दिव्यांग मुलांचे पालक, विशेष शाळांचे शिक्षक, जिल्हा परिषद कर्मचारी आणि उमंगचे सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिव्यांग सक्षमीकरणाच्या दिशेने आशेचा दीपस्तंभ ठरलेल्या 'उमंग'च्या कार्याची दखल राज्यस्तरावर घेतली जात असल्याचे या भेटीतून अधोरेखित झाले. आयुक्त सत्यजित बडे यांच्या भेटीमुळे केंद्रातील कर्मचारी, पालक आणि दिव्यांग मुलांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, दिव्यांग क्षेत्रातील कार्याला अधिक बळ मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवी संवेदना आणि पारंपरिक ज्ञानाच्या समन्वयातून पशुपालनात भरभराट -पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे

**मुंबई/प्रतिनिधी :** कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवी संवेदना आणि पारंपरिक ज्ञानाच्या समन्वयातून राज्यातील पशुपालन व्यवसायाला भरभराटी आणावी, असे आवाहन पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज येथे केले.

कारगिल कंपनीने सिजेंटा फाउंडेशन इंडिया आणि डिजिटल ग्रीन इंडिया यांच्या भागीदारीत महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यात एकात्मिक दुग्धव्यवसाय विकास उपक्रम सुरू केला आहे. मंत्रालयात आयोजित या उपक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमात श्रीमती मुंडे बोलत होत्या.

विभागाचे सचिव एन. रामास्वामी, कारगिल इंडियाचे अध्यक्ष आणि कारगिल ॲनिमल न्यूट्रिशन अँड हेल्थचे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक रविंदर बलाईन, डिजिटल ग्रीन इंडियाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निधी भसीन आणि सिनजेंटा फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम बोराडे आदी उपस्थित होते. तर अहिल्यानगर जिल्ह्यातून पशुपालक शेतकरी आणि इतर संबंधित व्यक्ती ऑनलाईन पद्धतीने कार्यक्रमास उपस्थित होत.

श्रीमती मुंडे म्हणाल्या की, शासनाचा नेहमीच ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकट करण्यावर आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यावर भर राहिला आहे. पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय हा आपल्या ग्रामीण जीवनमानाचा मुख्य कणा आहे. कारगिल, सिजेंटा फाउंडेशन आणि डिजिटल ग्रीन यांचा हा संयुक्त उपक्रम आपल्या विकसित महाराष्ट्र आणि विकसित भारत या संकल्पनेला गती देणारा ठरेल. तंत्रज्ञान, फार्मरचॅट सारखे कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डिजिटल मार्गदर्शन आणि थेट दारात पोहोचणारी पशु आरोग्य मित्र फिरती पशुवैद्यकीय सेवा यांच्या माध्यमातून अहिल्यानगरमधील हजारो शेतकऱ्यांना थेट फायदा होईल. पशु सखीच्या माध्यमातून महिलांचा वाढणारा सहभाग ग्रामीण महिला सक्षमीकरणाला नवी दिशा देईल. हा पथदर्शी प्रकल्प संपूर्ण राज्यासाठी एक आदर्श मॉडेल ठरेल, असा विश्वासही श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केला आहे.

क्षमता बांधणी प्रशिक्षण

अहिल्यानगरमधील राहुरी, राहता आणि श्रीरामपूर तालुक्यातील २६ गावांमधील ३ हजारहून अधिक शेतकऱ्यांपर्यंत पशु आरोग्य मित्र (मोबाईल व्हेटर्नरी व्हॅन) च्या माध्यमातून पशुवैद्यकीय सेवा पोहोचवली जात आहे. याशिवाय, १२० गावांधील ५ हजार शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डिजिटल सल्ला सेवा आणि क्षमता बांधणीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत दोन फिरते पशुवैद्यकीय दवाखाने उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या वाहनांमध्ये आधुनिक निदान साधने, औषधे आणि लसींसाठी कोल्ड–चेन सुविधा उपलब्ध असेल. यामुळे थेट शेतकऱ्यांच्या दारात वेळेवर उपचार मिळून जनावरांचा मृत्यूदर कमी होण्यास मदत होणार आहे.

## लातुरात पीकविम्यासाठी शेतकरी संघटनेचे चाबूक आपटत ठिय्या आंदोलन



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना केवळ चार महसूल मंडळात विमा मंजूर झाला आहे. इतर महसूल मंडळातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असताना शेतकऱ्यांना पीकविमा मिळाला नाही. त्यामुळे आज सोमवारी दुपारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गजानन बोळंगे यांच्या नेतृत्वात लातूर येथील कृषी अधीक्षक कार्यालयात चाबूक आपटत आंदोलन केले.

गतवर्षी अतिवृष्टीने जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे सोयाबीन पीक पूर्ण खरडून गेले. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. मात्र रेणापूर तालुक्यातील पानगाव आणि औसा तालुक्यातील भादा, बेलकुंड आणि जळकोट तालुक्यातील घोणसी महसूल मंडळातील शेतकऱ्यांना विमा मंजूर झाला. इतर महसूल मंडळातील पीक नुकसानीची दखलंच घेण्यात आली नाही. याला जिल्हा कृषी कार्यालय आणि आय सी आय सी आय लोम्बर्ड विमा कंपनी जबाबदार आहे. त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांचा पीकविमा तात्काळ देण्यात यावा. या मागणीसाठी शेतकरी संघटनेच्या वतीने आज सोमवारी लातूर येथील जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयासमोर दुपारी १२ वाजता आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करत कृषी अधीक्षक कार्यालयात चाबूक आपटून ठिय्या आंदोलन केले.

आयसीआयसी लोबार्ड कंपनीने लातूर जिल्ह्यातून ११८ कोटी रुपये पिकविम्याची रक्कम जमा केली. आणि तीन महसूल मंडळात १९ कोटी रुपये पीकविमा शेतकऱ्यांना वाटप केला आहे. म्हणजे १०० कोटींचा भ्रष्टाचार करण्यात आला आहे. असा आरोप गजानन बोळंगे यांनी केला. यावेळी विमा कंपनीचे प्रभास कुमार, कृषी अधीक्षक राजेंद्र कदम इतर अधिकाऱ्यांची दातखिळी बसली. शेतकऱ्यांनी प्रश्नाचा भडीमार केला.. तेव्हा कृषी अधीक्षक कदम यांनी आंदोलक शेतकरी, कार्यकर्त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना जर विमा आला नाही तर शेतकरी संघटना आयसीआयसी लोबार्ड कंपनीचा ऑफिस फोडणार असा इशारा शेतकरी संघटनेने शेवटी दिला. या आंदोलनात शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष गजानन बोळंगे भारतीय किसान सेना मराठवाडा प्रमुख बालाजी सूर्यवंशी, संपर्कप्रमुख दत्ता शिंगडे, तालुका प्रमुख सचिन निकम, युवा शेतकरी तालुकाप्रमुख सचिन खसे, वेंकट बोळंगे, अंगद खलंग्रे, दगडू कुसंगे, संगमेश्वर कोराटे, भागवत नागरगोजे, राजकुमार नागरगोजे, नानासाहेब जाधव, बाबू तिडके, जगन गवरे, बालाजी तिडके, इलाही शेख यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## लातूर येथे 'अमृत' संस्थेमार्फत पर्यटन क्षेत्रातील उद्योजकांसाठी आज 'उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रमा'चे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था 'अमृत' मार्फत राबविण्यात येत असलेल्या अमृत पर्यटन उपक्रमांतर्गत पर्यटन क्षेत्राशी संबंधित उद्योजक, व्यावसायिक व नवउद्योजकांसाठी मंगळवार, २ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम अमृत लातूर जिल्हा कार्यालय, पहिला मजला, पितृछाया बिल्डिंग, मयुरेश्वर अपार्टमेंट, सिग्नल कॅम्प, विद्यानगर, लातूर–४१३५१२ येथे होणार आहे.

'अमृत पर्यटन' हा महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राला गती देण्यासाठी, स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती वाढविण्यासाठी आणि पर्यटनाशी संबंधित उद्योजकांना सक्षम करण्यासाठी राबविण्यात येत असलेला एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील पर्यटन स्थळे, पर्यटन सेवा, स्थानिक उत्पादने आणि पर्यटन व्यवसायांना नवीन बाजारपेठ व संधी उपलब्ध करून देण्याचे प्रमुख उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

पर्यटन क्षेत्र हे सध्या देशातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या क्षेत्रांपैकी एक असून, यामध्ये व्यवसाय विस्तार, रोजगार आणि आर्थिक प्रगतीच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत. या संधींचा लाभ स्थानिक उद्योजकांना घेता यावा आणि त्यांना आधुनिक व्यवसाय व्यवस्थापन कौशल्ये प्राप्त व्हावीत, या उद्देशाने या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात टूर आणि ट्रॅव्हल्स व्यावसायिक, टुरिस्ट गाईड्स, कुक आणि केटरर्स, होमस्टे व रिसॉर्ट संचालक, पर्यटन सेवा पुरवठादार, धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाशी संबंधित उद्योजक तसेच पर्यटन क्षेत्रात नवीन व्यवसाय सुरू करू इच्छिणारे युवक–युवती सहभागी होऊ शकतात.

या कार्यशाळेदरम्यान सहभागी उद्योजकांना व्यवसाय उभारणी व विस्तारासाठी आवश्यक असणारे प्रभावी नियोजन, आधुनिक विपणन तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग, ग्राहक व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, ब्रँडिंग, पर्यटन क्षेत्रातील नवीन संधी आणि शासनाच्या विविध योजना व आर्थिक सहाय्याबाबत सविस्तर माहिती दिली जाणार असून, या क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ व यशस्वी उद्योजकांकडून प्रत्यक्ष अनुभवाधारित मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे. तरी लातूर जिल्ह्यातील पर्यटन क्षेत्राशी संबंधित सर्व उद्योजक, व्यावसायिक आणि इच्छुक युवक–युवतींनी या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले असून अधिक माहितीसाठी अमृतचे लातूर जिल्हा व्यवस्थापक शुभम मुळजकर (भ्रमणध्वनी क्र. ७३९१०६५४७०) या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

# राष्ट्रपतींना निवेदन : गायीला राष्ट्रीय पशू घोषित करण्याची मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** शेर–ए–हिंद शहीद टिपू सुलतान संघटनेच्या वतीने भारताच्या राष्ट्रपती मा. द्रौपदी मुर्मू यांना गायीला राष्ट्रीय पशू घोषित करण्याबाबत निवेदन सादर करण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, काही राजकीय पक्ष आणि संघटनांकडून गायीच्या मुद्द्याचा वापर करून समाजातील दोन समुदायांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच काही तथाकथित गोरक्षकांकडून कायदा हातात घेऊन सर्वसामान्य नागरिक तसेच विशिष्ट समुदायातील लोकांना त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.



या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने विशेष कायदा तयार करून गायीला राष्ट्रीय पशू घोषित करावे आणि तिच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी शासनाने घ्यावी, अशी मागणी संघटनेने राष्ट्रपतींकडे केली आहे. यामुळे सामाजिक सलोखा टिकून राहण्यास मदत होईल तसेच गायीच्या संरक्षणासाठी एकसमान आणि कायदेशीर व्यवस्था निर्माण होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या निवेदनावर शेर–ए–हिंद शहीद टिपू सुलतान संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शेख बशीर, सचिव शेख मुस्तफा, लातूर तालुका अध्यक्ष इसहाक कुरेशी, सोहेल कुरेशी, इम्रान झारेकर, रिजवान कुरेशी आणि जुनेद कुरेशी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.